परा आणि अपरां पासून प्राण्यांचा | सगळा जाणे जन्म तू | मी निर्मितो जगत सर्व | नेतो मी विलयास ते || ६|७|गी. समश्लोकी शरद काळे (थोडा बदल करून)

माझ्या लहानपणी “कापड अपुर पडलं म्हणून मग सदरा आखुड झाला” असे वाक्य ऐकल्याचे आठवते. त्यातला अपर हा शब्द संस्कृतातल्या अपर ह्या शब्दापासून आला आहे. अपर ह्या शब्दाच्या विरुद्ध असलेला शब्द परा असा आहे. हे विश्व कसे झाले तर ते दोन गोष्टींमधून झाले आहे. एक परा प्रकृति आणि दुसरी अपरा प्रकृति. परा प्रकृति ब्रह्मसमान आहे कारण ब्रह्म हे विश्वाचे स्त्रोत आहे. ह्यातून काय निर्माण होते तर अपरा प्रकृति (जेव्हा काळ सुरु होतो). पण ही प्रकृति किंवा अवस्था निरंतर नाही ती लय पावते आणि मग ब्रह्मात किंवा परा प्रकृतीत समाविष्ट होते अशी धारणा आहे. ह्या घडामोडीचा निर्माता मी आहे असे इथे श्रीकृष्ण म्हणतो कारण त्याला आपण ब्रह्मसमान मानला आहे. घडामोड हा शब्द बघा. त्यात घडणे आणि मोडणे दोन्ही आले. म्हणून हे अपुरे किंवा अपरा आहे. उलट परा प्रकृति चिरंतन आहे. ती चैतन्यमय आहे आणि म्हणून कायम जिवंत आहे. म्हणून त्यातून जीव जन्मू शकतात. ते किंवा तो जीव काय करतो तर तो जडाला सजीव करतो. सजीव गोष्ट विश्वाचा जो पसारा आहे त्याबाबत जाणून घेते त्याला विज्ञान म्हणतात. अंतिम ज्ञान विज्ञानाच्या पलीकडचे आहे. अपरा प्रकृति मनाला मोह किंवा शोक अनुभवयास लावते. ज्याला आपण बुद्धी म्हणतो ती मात्र ह्या परा प्रकृतीचे उत्पादन आहे. चतुरपणा आणि शहाणपणा दोन्ही ह्या बुद्धीचे देण आहेत. आणि ही बुद्धी अहंकाराच्या सहाय्याने ह्या विश्वात आपले कारनामे रचते किंवा जगाला धरून ठेवते. ओव्या मुळात अवघड आहेत म्हणून नंतर देतो आहे.

जे जडाते जीववी | चेतने ते चेतवी | मनाकरवी मानवी | शोक मोहो ||

पै बुद्धींचा अंगी जाणणे | तो जियेचि ये जवळेकेची करणे | जिया अहंकाराचेनि विंदाणे | जगचि धरिजे ||२०|२१|७|ज्ञा.

अर्थात लिहिण्याच्या ओघात मी घोड्यापुढे गडी लावली आहे. कारण ह्या अध्यायातला आधीचा चौथा श्लोक म्हणतो

पृथ्वी, पाणी, अग्नी, आकाश, आणि वारा शिवाय मन आणि अहंकार अशा आठ गोष्टींची ही अपुरी , लय पावणारी माझी अपरा प्रकृति आहे. तेराव्यात ह्याचे जास्त सविस्तर वर्णन मिळते. परंतु इथे श्रीकृष्ण एक दृष्टांत देत म्हणतो ही विभागणी जरी असली तरी त्या दोन्ही प्रकृत्या म्हणजे मीच एकत्रितपणे आहे. कशा तर सोन्याचे मणी सोन्याच्याच तारेमध्ये गुंफावे त्याप्रमाणे. मूळ श्लोकात सोन्याचा उल्लेख नाही. फक्त गुंफणे हा शब्द वापरला आहे. दांडेकर प्रतीतले हे प्रक्षिप्त भाषांतर जास्त संयुक्तिक आहे. मूळ श्लोक म्हणतो “मयि सर्वं इदं प्रोतम सूत्रे मणिगणा इव”. असो हे सगळे जरा क्लिष्ट आणि अवघड झाले आहे. ह्यानंतरच्या ओव्या सुलभ आहेत. त्या पुढच्या प्रकरणात.

४०० शब्द

**रविन थत्ते**

**rlthatte@gmail.com**

पै आदिचेनि अवसरे | विरुढे गगनाचेनि अंकुरे | जे अंती गिळी अक्षरे | प्रणव पटीची ||४०|७|ज्ञा. ओवीचा अर्थ देण्याच्या आधी आधुनिक पदार्थविज्ञान किंवा अंतरिक्ष विज्ञान काय म्हणते हे आठवलेले बरे. ब्रह्म किंवा एकलत्व फुटले आणि त्यातून जे प्रसूत झाले ते मावून घेण्यासाठी आकाशाचा जन्म झाला असा त्या विज्ञानाचा होरा आहे. आठशे वर्षांपूर्वी गीतेचा आधार न घेता परंतु इतर कुठल्यातरी संचितावर आधारित वर सांगितलेल्या ओवीचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे. जे(हे) आत्मतत्व (आत्म=बळ) सृष्टीच्या उत्पत्तिकाळी आकाशाच्या अंकुराने वाढते व जे सृष्टीच्या लयाच्या वेळी ओंकार रुपी पटावरील अक्षराचा ग्रास करते. ह्यातील ओंकाररुपी पट हे कवित्व खास भारतीय आहे. फुटण्याच्या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या विश्वात एक ध्वनिसदृश्य चैतन्यप्रकार विलसत होता त्या ध्वनीतून पुढे भाषा किंवा संगीत अवतरले (त्यात पशुपक्ष्यांचा संवादही अंतर्भूत आहे). त्याला अक्षर असे नाव देण्यात आले आहे. हे अक्षर अशासाठी की ते क्षर नसते किंवा ते सहजासहजी विरघळत नाही ते अक्षरतत्व सुद्धां आपल्या पटासकट विश्वाच्या लयाच्या वेळी गुंडाळून घेतले जाते असा ओवीचा भावार्थ आहे. काही आधुनिक होऱ्यांप्रमाणे हे अतिवेगवान पसरणारे जग पुढे असेच गुरुत्वाकर्षणाचा पगडा वाढल्यामुळे मध्यकेंद्री दिशेने प्रवास करत गडप होणार आहे. ह्याविषयीची ओवीही ज्ञानेश्वरांनी सांगितली आहे.

जव हा विश्वाकार असे | तवं चि ते विश्वाचि सारिखे दिसे | मग महाप्रलय दशे | कैसेही नव्हे ||४१|७|ज्ञा. ह्या ओवीतला प्रलय पाण्यामुळे होतो अशी आपली एक कल्पना असते परंतु विश्वाचा प्रलय पाण्याने होणे संयुक्तिक वाटत नाही कारण पृथ्वी सोडली तर विश्वात सध्याच्या अनुमानाप्रमाणे पाण्याची वानवाच आहे. परंतु प्रलय शब्दातला लय महत्वाचा. लय ह्या शब्दाचा अर्थ नाहीसा होणे किंवा विनाश पावणे असाही दिला आहे. असो. जो पर्यंत आपण आहोत तोवर आपल्यातली प्रेरणा शक्ती महत्वाची असते (काम – Motivation), कामासक्त, कामूक, कामातूर हे शब्द काम ह्या शब्दाच्या लैंगिक उपपत्ति आहे. प्रेरणाशक्ती ह्याहून कितीतरी विस्तारित असते आणि आपल्या प्रत्येक कर्मात ती उपस्थित असते. ही प्रेरणाशक्ती कशी वापरावी तर काम आणि राग ह्यांना वगळून धर्माला अनुकूल अशी वापरावी असे इथे श्रीकृष्णाचे गीतेतले वचन आहे.

बलं बलवंताच अहं | काम राग विवर्जित ||११|७|गी. इथला बळ शब्द महत्वाचा. आत्म(आत्मा) ह्या शब्दाचा एक अर्थ बळ असा आहे. हे बळ विधायक दृष्ट्या वापरावे असे श्लोक म्हणतो. धर्मातला धृ धरती, धरण, धैर्य धृति मध्येही अवतरतो त्यात विघटनाच्या क्रियेला विरोध आहे. गंमत अशी की सगळे ठीक असले तरी ते ह्या जगात माया नावाच्या नाटकाच्या अंतर्गत घडते. सगळेच जर खोटे तर मग वागायचे तरी कसे. तर माया ही नदी सारखी असते. त्या नदीबद्दल आणि तिला ओलांडायचे कसे ह्याबद्दल पुढच्या लेखात.

३७७ शब्द

**रविन थत्ते**

**rlthatte@gmail.com**